# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक ०३.१०.२०२६ शनिवार**

**उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार यांचा मा. अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग यांचे हस्ते गौरव :—**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय, दक्षिण प्रभाग अंतर्गत येणारे पोलीस ठाणे अंतर्गत दाखल असलेल्या गुन्हयामध्ये तपास करून दोषसिध्दी झाल्याने अधिकारी व पैरवी अंमलदार, घरफोडीचे गुन्हे उघडकीस करणारे, खुनाचे प्रयत्नातील आरोपीस अटक करणारे, वाहन चोरीचे उघडकीस आणणारे तसेच, आत्महत्या करणाऱ्या ईसमाचे प्राण वाचविणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा दिनांक ०२.१०.२०२६ रोजी, मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, नागपूर शहर यांनी त्यांचे कार्यालयात रिवार्ड, प्रशंसापत्र व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव केला.

पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत विनयभंग व पोक्सो चे दाखल गुन्ह्यातील आरोपीविरूध्द दोषसिध्दी होवुन, त्यास शिक्षा झाली. कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. नितीन सिरसाट., पोलीस ठाणे वाठोडा येथे दाखल दुखापतीचे गुन्ह्यातील आरोपीविरूध्द दोषसिध्दी होवुन, त्यास शिक्षा झाली. कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. संजय ठाकरे, मपोअं. किरण चिडे, पोलीस ठाणे यशोधरानगर येथे दाखल जबरी संभोग व पोक्सो चे गुन्ह्यातील आरोपीविरूध्द दोषसिध्दी होवुन, त्यास शिक्षा झाली. तपासी अधिकारी मसपोनि. श्रीमती मेघा गोखरे व कोर्ट पैरवी अधिकारी पोअं. दिग्वीजय वेरूळकर, मयुर लोहकरे व मपोअं. नम्रता मेश्राम यांचा

तसेच, पोलीस ठाणे भांडेवाडी येथे दाखल घरफोडीचे गुन्ह्यातील आरोपीस अटक करून, त्याचेकडुन एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणुन मुद्देमाल जप्त करणारे वपोनि. श्री. नितीन चरडे, पोउपनि. दिपक आलुरकर, पोहवा. अश्वीन बडगे, सुनिल वानखेडे व पोअं. मिलींद ठाकरे यांचा,

तसेच, पोलीस ठाणे नंदनवन येथे दाखल वाहनचोरीचे गुन्ह्यात विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेवुन, त्यांचेकडुन एकुण ०९ गुन्हे उघडकीस आणुन, मुद्देमाल जप्त करणारे वपोनि. कैलास देशमाने, सपोनि. उमाकांत राठोड, पोउपनि. संतोषकुमार रामलोडे, पोहवा. दिनेश जुगनहाके, पोअं. प्रविण मरापे, राहुल खडतकर, सोमेश्वर घुगल व मपोहवा. स्वाती कुमरे यांचा,

पोलीस ठाणे वाडी येथे दाखल खुनाचे प्रयत्नातील गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेवुन, त्यांना अटक करून, गुन्हा उघडकीस आणणारे सपोनि. कुणाल धुरट, पोहवा. रोशन फुकट, राहुल बोटरे यांचा,

पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीतील बिट मार्शल यांनी प्राप्त सुचनेवरून, त्वरीत घटनास्थळी जावुन, बुध्दीचातुर्याचा वापर करून, आत्महत्या करणाऱ्या ईसमांचे प्राण वाचविले व त्यास आत्महत्या करण्यापासुन परावृत्त करणारे बिट मार्शल पोअं. रामेश्वर गेडाम व राकेश तिडके.

वरील सर्व उत्कृष्ठ कामगिरी बजावणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना बक्षीसे व प्रमाणपत्रे देवुन त्यांचा सत्कार करून, त्यांनी भविष्यात अशाच प्रकारे उत्कृष्ठ कामगिरी करण्यासाठी शुभेच्छा देवुन प्रोत्साहीत केले.



(कामगिरी)

१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—

दिनांक ०२.१०.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ३४ केसेसमध्ये ३५ ईसमावर कारवाई करून एकुण १,२३,५३१/—रू. चा मुद्देमाल जप्त केला.

दिनांक ०२.१०.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०३.१०.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ४० केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ३२ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १६८ केसेस, ऑन रोड पार्कीग कलम १२२/११७ मोवाका अन्वये २१७ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये ५८ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये ८४ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ४७ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ८८ केसेस, धोकादायकरित्या बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०५ केस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ३० केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४ बी(१) मोवाका अन्वये २१ केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १,२७४ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०६ केस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १७ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण २,१३८ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. ९,८०,०००/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरी करणाऱ्या सराईत चोरास अटक.

दिनांक १५.०९.२०२६ चे २२.३० वा. ते दि. १६.०९.२०२६ चे ०८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमना हद्दीत प्लॉट नं. ३२१, चित्रशाळा नगर, कळमना वस्ती येथे राहणारे फिर्यादी मोहम्मद शाहरूख अब्दुल उर्फ शेख, वय २९ वर्षे यांनी त्यांची बजाज प्लॅटीना दुचाकी क्र. एम.एच. ४० सि.ई ३५१५ किंमती ३०,०००/—रू. ची आपले राहते घरासमोर लॉक व पार्क करून ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी मयुर विष्णु बोरकर, वय २२ वर्षे, रा. बालाजी नगर, कळमना, नागपूर यास ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा त्याचा साथीदार पाहीजे आरोपी २) रितीक, रा. चित्रशाला नगर, कळमना याचेसह केल्याची कबुली देवुन, चोरीचे वाहन त्याने आरोपी ३) आनंद मोहनलाल अग्रवाल, वय ३८ वर्षे, रा. एलआयजी २५, जुना कामठी रोड, व्ही एच बी ग्राऊंड समोर, शांतीनगर कॉलोनी, शांतीनगर, नागपुर यास विक्री केल्याचे सांगीतले. आरोपी क्र. ३ यास ताब्यात घेवुन, त्याचे ताब्यातुन दुचाकी वाहनांचे ११ इंजीन, ०१ पेट्रोल टंकी असा एकुण ३६,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी क्र. १ व ३ यांना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव कळमना पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपी क्र. २ चा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे,) मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे, पोउपनि. राहुल रोटे, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा. नारायण पारवेकर, चंद्रशेखर भारती, मनिष मिश्रा, पोअं. रविंद्र राऊत, प्रफुल्ल पारधी, दिनेश महल्ले, लक्ष्मीकांत सोनटक्के, राहुल पाटील, सुनिल यादव व विरेंद्र पांडे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे बजाजनगर :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक ०२.१०.२०२६ चे २२.३५ वा. चे सुमारास, बजानगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, प्रमीला किराणा दुकान समोर, दंतेश्वरी वस्ती येथे एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव संदीप दिलीप वर्मा, वय २२ वर्षे, रा. दंतेश्वरी वस्ती, गुरूदेव किराणा स्टोअर्स जवळ, बजाजनगर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३७५३/२०२६ दिनांक ११.०८. २०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. मंगेश डहाके यांनी दिलेल्या

तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे पोउपनि. पंकज बावणे यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कपीलनगर :– जिवे ठार मारणाऱ्या आरोपी पतीस अटक.**

पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत, न्यु म्हाडा क्वॉर्टर, कामगार नगर येथे राहणाऱ्या सौ. लक्ष्मी रोशन शहाकार, वय ३२ वर्षे ह्या दिनांक ३०.०९.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, राहते घरासमोर कपडे वाळविण्यासाठी जात असतांना, पायरीवरून पाय घसरून पडल्याने, त्यांचे डोक्याला मार लागुन त्या जखमी झाल्या. त्यांना त्यांचे पतीने दवाखान्यात जाण्यास म्हटले असता, त्यांनी नकार दिला होता. दिनांक ०१.१०.२०२६ रोजी प्रकृती जास्त खराब झाल्याने त्यांना खाजगी दवाखान्यात व तेथुन मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक ०१.१०.२०२६ चे १९.०० वा. डॉक्टरांनी त्यांना त्यांना तपासुन मृत घोषित केले होते. याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून, पो.ठाणे कपीलनगर येथे अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली होती.

अकस्मात मृत्युचे चौकशीमध्ये व मृतकाचा भाऊ फिर्यादी नामे पवन शंकर मानकर, वय २७ वर्षे, रा. प्लॉट नं. ३१, गोपाल नगर, उस्मान ले–आऊट, राणाप्रतापनगर, नागपुर यांनी दिलेल्या बयानानुसार मृतक सौ. लक्ष्मी रोशन शहाकार ह्यांना त्यांचा पती आरोपी नामे रोशन किशोर शहाकार, वय ४२ वर्षे हा त्यांचे चारीत्र्यावर नेहमी संशय घेवुन, त्यांना मारपिट करीत होता. घटनेवेळी सुध्दा त्याने तिला लाथा–हातबुक्कीने मारहाण करून, गंभीर जखमी केल्याने, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला. आरोपी याने त्यांना मारहाण करून जिवानिशी ठार केले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि. मेश्राम ९८२३०६३८३९ यांनी आरोपी पतीविरुध्द कलम १०३(१) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**३) पोलीस ठाणे मानकापुर :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०९.०९.२०२६ चे ०७.०० वा. ते दिनांक ०२.१०.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत, प्लॉट क्र. ०६, नर्मदा हाऊसिंग सोसायटी, महालक्ष्मी मंदीर जवळ, गोरेवाडा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी सुरज शालकराम निंबाळकर, वय ४० वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह मुळ गावी जि. बुलढाणा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ७२,०००/–रू. तसेच, सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ६,८६,३००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे मपोउपनि. प्राजली आंबेडकर ७०२०३२९३६७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. जिल्हा न्यायाधिश –२१, तथा अती सत्र | २२२/ २०२५ | कलम १४३, ३३६, ३३२ | १) नंदलाल रामचंद्र यादव, वय ७० वर्षे, | ०७.१०.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | न्यायाधिश साहेब, वर्धा. | | भा.दं.वि. | २) मोहम्मद राशीद मुस, वय ३१ वर्षे, दोन्हीही रा. टेकडी रोड, सिताबर्डी, नागपुर. | |
| २ | मा. राज्य ग्राहक महासंघ आयोग, खंडपिठ नागपुर. | ई.ए./१७/ २०२० | कलम २७ ग्राहक संरक्षण कायदा– १९८६ | मे. प्राईम इन्फ्रा ॲण्ड रिसोर्ट्स श्री. सतीष श्रीनाथ भगत, रा. न्यु आमदार निवास, सर्व्हंट क्वॉर्टर, विंग नं. ४, सिव्हील लाईन, नागपूर. | १२.१०.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**